# प्रकरण २ रे

२१/१/०६

## ॲरिस्टॉटल (इ.स.पूर्व ३८४ - इ.स.पु. ३२२)

१) प्रस्तावना :

ॲरिस्टॉटल हा राज्यशास्त्राचा जनक आहे राज्यशास्त्राला शास्त्रीय रूप देणारा तो पहिला विचारवंत आहे तसेच तो प्लेटोचा शिष्य आहे. ग्रीक राजकीय तत्वज्ञान सॉक्रेटिसने बीज रूपाने आणले. प्लेटोने त्या बिजाचे रुपांतर वेलीत केले. आणि ॲरिस्टॉटलने ते तत्वज्ञान पुष्प रूपाने उमलण्यास मदत केली प्लेटोचे तत्वज्ञान ॲरिस्टॉटलनी जसेच्या तसे स्विकारले नाही प्लेटोच्या अनेक तत्वावर त्यांनी टिका केली आहे प्लेटो जेथे थांबतो तेथून ॲरिस्टॉटल सुरु होतो. भौ-जनशील तत्वापासून ॲरिस्टॉटलच्या प्रारंभ होतो.

ॲरिस्टॉटलचा जन्म इ.स. पुर्व ३८४ मध्ये मॅसेडोनियामधील स्टॅगिरा नावाच्या नगरामध्ये झाला. त्याचे वडिल राजवैद्य होते. साधारणता २० वर्षे त्यांनी प्लेटोच्या अकॅडमीमध्ये अध्ययन केले. नंतर इ.स. पुर्व ३४६ मध्ये राजा सिकंदरचा शिक्षक बनले. इ.स. पुर्व ३३५ मध्ये लिसियम नावाची पाठशाळा सुरु केली. व शेवटी इ.स. पुर्व ३२२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

२) ग्रंथलेखन :- ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्र अर्थशास्त्र नितिशास्त्र, अध्यात्मशास्त्र, तर्कशास्त्र, ज्योतिषशास्त्र, साहित्य, कला व. अनेक विषयावर साधारणता ४०० ग्रंथाचे लेखन केले आहे.

राज्यशास्त्राच्या दृष्टीने १) द पॉलिटिक्स

२) द ~~कॉन्स्टिट्यूशन~~ हे दोन ग्रंथ महत्वाचे
कॉन्स्टीट्युशन

आहेत.

3) ॲरिस्टॉटलवरील प्रभाव :-
1) कुटुंबाचा प्रभाव -
2) आर्थिक परिस्थितीचा प्रभाव - (श्रीमंती)
3) वैवाहिक जिवनाचा प्रभाव - (सुखमय व यशस्वी)
4) ग्रीक संस्कृतीचा प्रभाव -
5) गुलामगिरीच्या परंपरेचा प्रभाव - (समर्थन)
6) प्लेटोचा प्रभाव -

4) ॲरिस्टॉटलची अध्ययन पद्धती → प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या सिद्धांतामध्ये बरेच अंतर आहे. प्लेटोचे सिद्धांत काल्पनिक होते, तर ॲरिस्टॉटलचे सिद्धांत वास्तविक होते. ॲरिस्टॉटलने (1) वैज्ञानिक (2) विश्लेषणात्मक (3) ऐतिहासिक (4) आगमनात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

महत्त्वाचा 20 mark

* ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार

1) प्रस्तावना -
2) ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार :- ॲरिस्टॉटलने पॉलिटिक्स नावाच्या ग्रंथात राज्यासंबंधीचा विचार मांडला आहे. राज्याचा जन्म विकासातून झालेला आहे. राज्य ही एक नैसर्गिक संस्था आहे. राज्याचा उद्देश आणि कार्ये नैतिक आहेत. त्यामुळे ही संस्था इतर संस्थांपेक्षा श्रेष्ठ आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. ॲरिस्टॉटलच्या राज्यासंबंधीच्या विचारात खालील गोष्टींचा समावेश होतो.

① राज्याचा उदय / उत्पत्ती :- ॲरिस्टॉटलच्या मते कुटुंबसंस्थेमधून राज्यसंस्थेची निर्मिती झालेली आहे. कुटुंबामधील राज्याची बीज सापडतात. स्त्री पुरुष परस्पर संबंध आल्याने कुटुंबसंस्था निर्माण होते. त्यातून खेडे किंवा गाव निर्माण होते त्यातून शहरे, प्रांत यामध्ये रुपांतर होवून राज्यसंस्थेचा उदय होतो. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

② राज्य एक स्वाभाविक संस्था आहे :- प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलनेही राज्यसंस्था ही स्वाभाविक किंवा नैसर्गिक संस्था आहे असे मत मांडले आहे. आणि या राज्याची उत्पत्ती विकासातून झाली आहे असे त्यांचे मत आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्यामुळे तो एकटा राहू शकत नाही, एकटा जिवन जगू शकत नाही. मनुष्याच्या स्वाभाविक शक्तीचा विकास फक्त मनुष्याच्या सहकार्याने, सहानुभूतीने आणि सहयोगानेच होवू शकतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. *

③ राज्याचे स्वरुप :- ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे स्वरुप जैविक किंवा सेंद्रिय किंवा आंगिक आहे. म्हणजेच राज्य हे मानवी शरिरासारखे आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. शरिराचे हात, पाय, नाक, डोळे, कान, आत्मा, रक्तवाहिन्या इ. विभिन्न अवयव असतात. यापैकी एखाद्या अवयवास शरिरापासून अलग केले तर त्या अवयवास काहीच किंमत किंवा महत्व वाटत नाही. त्याचप्रमाणे राज्याचे विभिन्न घटक (अवयव) उदा- व्यक्ती,

Scanned with CamScanner

समुदाय, शासक वर्ग (सरकार), प्रजा, वस्ती इ. असतात
शरीराप्रमाणेच राज्याच्या एखाद्या घटकास राज्यापा-
सून बाजूला केले तर त्या घटकास किंवा राज्यरूपी अवय-
वास महत्त्व राहात नाही. शरीराच्या अवयवाप्रमाणे
राज्याच्या अवयवांनी कार्य केले पाहिजे. शरीर आणि
हात यांचा जसा संबंध असतो तसाच संबंध राज्य व
व्यक्तीचा असतो. शरीर नष्ट झाल्यास जसे अवयवां
ना किंमत राहात नाही तसेच राज्यरूपी शरीर नष्ट
झाल्यास राज्याच्या घटकांना, व्यक्तींना किंवा
इतर घटकांना सुद्धा काहीच महत्त्व राहात नाही असे
ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(4) राज्य हा एक सर्वोच्च समुदाय आहे :-
ॲरिस्टॉटलच्या मते राज्य एक सर्वोच्च संस्था आहे. माणसा
च्या विविध आवश्यकता किंवा गरजा पुर्ण करण्यासाठी विविध
समुदाय अस्तित्वात आले. राज्याशिवाय कोणताच समुदाय
आपला उद्देश पुर्ण करू शकत नाही. राज्याचे त्यावर नियंत्रण
असते.

(5) राज्य व्यक्तीच्या पाठीशी :- ॲरिस्टॉटल हा जै-
विक सिद्धांताचा पुरस्कर्ता आहे राज्य व्यक्ती-
च्या पाठीशी आहे हे ॲरिस्टॉटलचे मत विचित्र वाटते
पण त्याचा मतितार्थ समजून घेतल्यास तो योग्य
वाटतो.

~~योग्य वाटते~~. ऐतिहासिक दृष्टया विचार केल्यास
व्यक्ती कुटुंब गाव आणि राज्य असा विकासाचा क्रम
लागतो. परंतू त्याच्या या मताकडे ऐतिहासिक दृष्टीकोना-
तून न पाहता तार्किक दृष्टीकोनातून पहायला पाहिजे

रविवार
22/1/06

त्यांच्या मते राज्य हे पूर्ण शरीर आहे. आणि पूर्ण शरीराच्या उत्पत्तीशिवाय अवयवांची उत्पत्ती शक्य नाही. शरीराशिवाय आपण इतर अवयवांची कल्पनाच करू शकत नाही. डोळा तेव्हाच कार्य करेल जेव्हा तो शरीराचा अभिन्न भाग असेल. शरीराशिवाय तो निरुपयोगी ठरेल या जैविक सिद्धांतानुसारच राज्य प्रथम व व्यक्ती नंतर असा क्रम लागतो.

(6) राज्य एक स्वावलंबी समुदाय :- ॲरिस्टॉटलने स्वावलंबित्व हे एक राज्याचे वैशिष्ट्य आहे असे मत मांडले. राज्यामध्ये नागरिकांच्या सर्व मूलभूत, भौतिक, आध्यात्मिक आवश्यकता पूर्ण झाल्या पाहिजेत. मनुष्याच्या सर्व गरजा पूर्ण होवून त्याला सुखी जिवन जगता आले पाहिजे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. त्यांच्या काळात सर्व राज्य स्वावलंबी होते. परंतू आधुनिक काळात स्वावलंबी राज्य शोधूनही सापडणार नाही. प्रत्येक राज्य परस्परावर अवलंबून आहे.

(7) विविधतेत एकता :- ॲरिस्टॉटलने विविधतेत एकतेचे समर्थन केले आहे. राज्याने आवश्यक गोष्टीवर नियंत्रण ठेवावे. इतर गोष्टीत नागरिकांना स्वातंत्र्य असावे. राज्यामध्ये विभिन्न प्रकारचे लोक असतात. त्यांच्यातील विभिन्नता नष्ट करणे म्हणजे अत्यंत सामान्य दर्जाचे राज्य निर्माण करणे होय. ज्याप्रमाणे सुंदर चित्र विभिन्न रंगाच्या मिश्रणाने तयार होते. त्याचप्रकारे आदर्श राज्य निर्माण होण्यासाठी विभिन्न अंगामध्ये एकता असणे आवश्यक आहे.

8) राज्य एक क्रमिक विकास आहे :- ॲरिस्टॉटल राज्याच्या विकासवादी सिद्धांताचे समर्थन करतो. त्याच्या मते राज्याचा विकास मानवी हित साधण्यासाठी किंवा नैतिक सिद्धांतासाठी झाला आहे, असे त्यांचे मत आहे.

9) राज्याचे उद्देश :- ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचा उद्देश व्यक्तीचा विकास करणे त्याला सर्वोत्तम जीवन प्राप्त करून देणे त्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे. व्यक्तीसमोरील समस्या दूर करणे हे राज्याचे उद्देश आहेत असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

10) राज्याची कार्ये :- राज्याचा उद्देश पूर्ण करण्यासाठी राज्याला काही सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारची कार्ये करावे लागते. उदा. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे-अधिकाराचे संरक्षण करणे, अन्याय-अत्याचार दूर करणे, मूलभूत-भौतिक गरजांची पूर्तता करणे, व्यक्तीच्या विकासासाठी शिक्षणाची व्यवस्था करणे इ. कार्ये राज्याला पार पाडावी लागतात.

10 marks

11) राज्याचे वर्गीकरण :-

1) प्रस्तावना :- } दोन पेज वर्णन करणे
2) राज्यासंबंधीचा विचार :- }
3) राज्याचे वर्गीकरण :- ॲरिस्टॉटलने पॉलिटिक्स ग्रंथाच्या तिसऱ्या भागात राज्याचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे. राज्याच्या वर्गीकरणासाठी दोन तत्त्वे वापरली आहेत. (1) संख्यातत्त्व :- संख्यातत्त्व

म्हणजे राज्यातील सार्वभौम सत्तेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची संख्या किती आहे हे पहाणे.

(२) गुणात्मक :- गुणात्मक म्हणजे राज्यसत्ता वापरण्यामागील त्या व्यक्तींचा हेतू कोणता आहे हे पहाणे. म्हणजे ते स्वार्थी आहेत की निस्वार्थी आहेत हे पहाणे होय.

वरील दोन आधार गृहीत धरून राज्याचे दोन प्रकार पाडले आहेत.

(१) शुद्ध प्रकारचे राज्य (२) अशुद्ध प्रकारचे राज्य

(१) शुद्ध प्रकारचे राज्य :- राजेशाही, महाजनसत्ता व जनतंत्राचा उल्लेख केला आहे.

(२) तर अशुद्ध प्रकारामध्ये हुकूमशाही, अल्पजनसत्ता व झुंडशाहीचा उल्लेख केला आहे व त्या सर्व प्रकाराचा उल्लेख खालील प्रमाणे करता येईल.

(१) राजेशाही :- हा शुद्ध प्रकार आहे. या प्रकारात सत्ता ही एका व्यक्तीच्या हातामध्ये असते. या व्यक्तीचा उद्देश लोककल्याणाचा असतो. म्हणजेच चांगला प्रकार आहे. यात जनतेच्या तसेच समाजहिताचा, कल्याणाचा विचार केला जातो.

(२) हुकूमशाही :- राजेशाहीचा पुढचा टप्पा म्हणजे हुकूमशाहीचा होय. हा अशुद्ध प्रकार आहे. सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती असते व तो स्वतःच्या स्वार्थाचा विचार करून सत्ता वापरतो जनहिताचा विचार करत नाही.

(3) महाजनशाही :- हा सत्तेचा शुद्ध प्रकार आहे. धान काही व्यक्ती एकत्र येतात व जनहिताच्या दृष्टी-ने त्यांच्या कल्याणासाठी विचार करतात व सत्ता चालवतात.

(4) धनिकतंत्र :- महाजनशाहीचा अशुद्ध प्रकार म्हणजे धनिकशाही होय. कालांतराने महाजनशाहीतील लोक स्वार्थी बनतात व सत्ता संपादन करतात यामध्ये लोकहिताचा विचार केला जात नाही.

(5) जनतंत्र / घटनात्मक लोकशाही :- धनिकसत्ते-च्या समाप्तीसाठी अनेक लोक एकत्र येऊन जनतंत्र हा शुद्ध प्रकार स्वीकारतात. याचा उद्देश लोकांच्या हिताचा व कल्याणाचा असतो. यालाच घटनात्मक लोकशाही असेही म्हणतात.

(6) झुंडशाही / लोकशाही :- कालांतराने देशातील लोक नंतर स्वतःच्या स्वार्थाचा विचार करता-त त्यातून झुंडशाही निर्माण होते हा सत्तेचा अशुद्ध प्रकार आहे. हे लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करतात.

(12) राज्याच्या चक्राकार सिद्धांत :-

1) प्रस्तावना :-

2) राज्यासंबंधीचा विचार :- 1 प्रकरण

3) राज्यांचे वर्गीकरण :- "

4) चक्राकार सिद्धांत :- ऍरिस्टॉटलने राज्या-च्या वर्गीकरणानंतर राज्याच्या परिव-र्तनाचे गतिचक्र किंवा चक्राकार सिद्धांत स्पष्ट केले आहेत त्याला तौलनिक शोधा मोठे गार्नर मॅन्ड आरशोटी म्हणतात. त्यांच्या मते क्रमामध्ये

ज्याप्रकारे स्वाभाविक रूपामध्ये बदल होतो. त्या-प्रकारे शासनामध्येही परिवर्तनाचे चक्र चालू राहाते. राजकीय परिवर्तनाचे चक्र हे राजेशाही पासून सुरु होते असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. नंतर क्रमाने हुकूमशाही, कुलीनतंत्र, धनिकतंत्र, जन-तंत्र, आणि झुंडशाही यामध्ये परिवर्तन होवून पण या झुंडशाहीचे परिवर्तन राजेशाहीत होते व तेच क्रम सतत चालू राहातो. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. याला तो चक्राकार सिद्धांत म्हणतो. त्यामध्ये खालील तत्त्व दिसून येतात

(1) सत्ता स्थिर नसते :- सत्ता ही स्थिर नवहता अस्थिर असते. ती कालानुसार बदलत असते. राजेशाहीचे रूपांतर हुकूमशाही, महाजनतंत्र, धनिकतंत्र, जनतंत्र, झुंडशाही यामध्ये होते. व पुन कालांतराने या झुंडशाहीचे रूपांतर पुन्हा राजेशाहीमध्ये होते.

(2) शुद्धाकडून अशुद्धाकडे व परत शुद्धाकडे :- परिवर्तन होते. प्रथम लोककल्याणाचा विचार करणारा व्यक्ती काही काळाने स्वतःच्या स्वार्था-चा विचार करतो त्यामुळे शुद्धाकडून अशुद्धा-कडे तो जातो.

(3) स्वाभाविक सतत फिरत असते :- ॲरिस्टॉटल-च्या मते राजकीय परिवर्तनाचे हे सत्ता-चक्र प्रथम राजेशाहीपासून सुरु होते यावेळी राज्याचे स्वरूप निःस्वार्थी जनकल्याणाचे असते पण राज्याचा एखादा उत्तराधिकारी जनकल्या-

ज्यावेळी स्वतःचा विचार करतो आशावेळी त्या राजेशाहीचे रुपांतर हुकुमशाही या अशुद्ध प्रकारामध्ये होते असे त्यांचे मत आहे. हुकूमशहाच्या अन्याय अत्याचाराला कंटाळून राज्यातील काही बुद्धीमान कुलीन लोक त्या हुकूमशहाच्या निरंकुश सत्तेला विरोध करून सत्ता आपल्या हाती घेतात. या प्रकाराला कुलीनतंत्र असे म्हणतात. हा शुद्ध प्रकार आहे नंतर यामध्येही स्वार्थ जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष केले जाऊ लागते. त्यावेळी त्याचे परिवर्तन धनिकतंत्रात होते. धनिकतंत्राच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध जनता बंड पुकारते व सत्ता आपल्या हातामध्ये घेते या सत्तेच्या प्रकाराला जनतंत्र किंवा घटनात्मक लोकशाही म्हणतात. परंतु कालांतराने त्यामध्ये अज्ञानी स्वार्थी लोकांचा समावेश होतो व ते स्वतःच्या स्वार्थाचा विचार करतात जनतेकडे दुर्लक्ष करतात त्यावेळी त्या जनतंत्राचे रुपांतर झुंडशाहीत होते यामध्ये अव्यवस्था, गोंधळ भ्रष्टाचार निर्माण होतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. झुंडशाही हा वाईट प्रकार आहे. कालांतराने या प्रकाराला कंटाळून एखादी योग्य व्यक्ती आपल्या हाती सत्ता घेवून कायदा व व्यवस्था प्रस्थापित करते व पुन्हा राजेशाही निर्माण होते यामध्ये पुन्हा वरीलप्रमाणे राज्याचे परिवर्तन चक्र चालू राहते हे चक्र सतत चालू राहील असे ॲरिस्टॉटलचे मत आहे यालाच चक्राकार सिद्धांत म्हणतात.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार स्पष्ट करता येतील.

राज्याच्या वर्गीकरणातील त्रुटी / दोष

(१) प्लेटोचा प्रभाव :- ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणावर प्लेटोच्या 'द स्टेट्समन' या ग्रंथातील वर्गीकरणाचा प्रभाव पडला आहे. त्यामध्ये ॲरिस्टॉटलने थोडा बदल करून सुधारित आवृत्ती त्याने ती मांडली आहे.

(२) सरकारचे वर्गीकरण राज्याचे वर्गीकरण नाही :- ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण वास्तविक शासनाचे वर्गीकरण आहे. राज्य व शासनामध्ये त्यांनी फरक केला नाही. परंतु आधुनिक काळात त्यामध्ये फरक केला जातो. राज्यासाठी लोकसंख्या, भूप्रदेश, शासन, सार्वभौमत्व या चार गोष्टी आवश्यक मानतात. तसेच राज्य स्थिर असून शासन अस्थिर असते.

(३) लोकशाहीला योग्य स्थान नाही :- ॲरिस्टॉटलने लोकशाहीला योग्य स्थान दिले नाही. लोकशाहीला तो झुंडशाही मानतो. लोकशाही हा अशुद्ध प्रकार आहे असे तो सांगतो. परंतु वर्तमान काळात तर लोकशाही हा सर्वश्रेष्ठ प्रकार मानण्यात येत आहे.

(४) अपूर्ण विचार :- ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण आधुनिक काळात निरुपयोगी व अपूर्ण आहे कारण त्यामध्ये लोकसंख्या,

अध्यक्षीय लोकशाही, संसदीय लोकशाही, एकात्म शासन, संघात्म शासन इ. चा उल्लेख नाही.

(5) राज्य शासन आणि संविधान यांना एकच मानले :- ॲरिस्टॉटलने राज्य, शासन व संविधान यासंदर्भात कोणताही भेद न करता या सर्वांना एकच मानले आहे. परंतु या तिन्हीही संकल्पना वेगळ्या आहेत असे टिकाकारांचे मत आहे.

(6) परिवर्तनाचे चक्र दोषपूर्ण आहे :- ॲरिस्टॉटलचे परिवर्तनाचे चक्र चुकीचे ठरत आहे कारण ॲरिस्टॉटलने सांगितलेल्या क्रमाने शासनामध्ये बदल होत असल्याचा दिसत नाही. असे टिकाकारांचे मत आहे.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणात दोष असलेले दिसून येतात.

IMP 20 marks ॲरिस्टॉटलचे गुलामगिरीचे विचार

1) प्रस्तावना

2) गुलामगिरीसंबंधीचा विचार :- ॲरिस्टॉटलने गुलामगिरीच्या प्रथेचे समर्थन केले आहे.

(1) गुलामगिरीचे समर्थन :- ॲरिस्टॉटलने गुलामगिरी प्रथेचे समर्थन केले आहे कारण ॲरिस्टॉटलच्या काळात ग्रीकमध्ये गुलामगिरीची पद्धत रूढ होती. ॲरिस्टॉटलसुद्धा अनेक गुलाम बाळगत होता. ग्रीकमधील जमीन कुलीन लोकांची होती. त्यावर काम करणाऱ्या मजुरांच्या पालन-पोषणाची जबाबदारी कुटुंब प्रमुखाची होती. जमिनीवर काम करणारे

मजूर दारिद्र्य, बुद्धीहीन, युद्धबंदी इतर देशाकडून विकत आणले होते.

(२) गुलाम खाजगी संपत्ती :- ॲरिस्टॉटलच्या मते गुलाम म्हणजे मालक वर्गाची एकप्रकारे खाजगी संपत्तीच होती. ॲरिस्टॉटल संपत्तीचे सजीव व निर्जीव असे दोन प्रकार सांगतो. सजीव संपत्तीत प्राणी, जनावरे व गुलामांचा समावेश होतो. तर निर्जीव संपत्तीत शेती, पैसा, सोने, चांदी, घर व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश होतो.

एका सुखी व समृद्ध कुटुंबासाठी या दोन्ही संपत्तीची आवश्यकता असते. गुलामांचा वापर करण्याचा संपूर्ण अधिकार मालकाचा असतो. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(३) गुलाम आणि मालकातील फरक :- ॲरिस्टॉटलने गुलाम आणि मालकामध्ये फरक करताना असा विचार मांडला आहे की, जन्मतः ज्या व्यक्तीकडे बुद्धी असते, ज्ञान असते, कौशल्य असते तो मालक बनतो व ज्या व्यक्तीकडे बुद्धी, ज्ञान, कौशल्य जन्मतः नसते तो गुलाम बनतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(४) नैसर्गिक प्रथा :- ॲरिस्टॉटलच्या मते गुलामगिरीची प्रथा ही नैसर्गिक आहे. नैसर्गिक किंवा स्वाभाविक व्यक्तीमध्ये असमानता असते विषमता हा निसर्गाचा नियम आहे किंवा उत्कृष्टाने निकृष्टावर शासन करणे हाही एक प्रकारचा नियम आहे काही लोक जन्मतः बुद्धीमान असतात तर काही

मूर्ख असतात. बुद्धीहीन असतात.

(5) योग्य व्यक्तीने अयोग्य व्यक्तीवर शासन करणे :– शासन करणे ही एक कला आहे व ही कला सर्वांना जमते असे नाही. काही व्यक्तींना जन्मतः शासन करण्याचे कौशल्य असते. काही व्यक्ती त्यासाठी योग्य असतात. त्या योग्य व्यक्तींनीच अयोग्य व्यक्तीवर शासन करावे. बुद्धीहीनांवर (गुलाम) शासन करावे. शासक आणि शासित यांचा परस्पर संबंध आत्मा आणि शरीर यांच्याप्रमाणे आहे. आत्म्याच्या आज्ञेनुसार शरीर व शरीराचे अवयव जसे काम करतात तसेच मालकाच्या आदेशानुसार गुलामाने काम करावे त्यामुळे दोघांचेही हित होईल.

(6) दास प्रथा दोन्ही पक्षास उपयुक्त :– (अ) गुलामगिरी मालकास लाभदायक :– ही प्रथा मालक आणि गुलाम या दोघांनाही लाभदायक आहे. मालक आपल्या बुद्धीचा उपयोग राज्यकारभार इ. साठी करतो. हे कार्य करण्यासाठी त्याला शारीरिक श्रमापासून मुक्तता करणे आवश्यक आहे. शारीरिक श्रमाचे काम गुलाम सांभाळतो त्यामुळे मालकास वेळ मिळतो म्हणून दास-प्रथा ही लाभदायक आहे.

(ब) गुलामास लाभदायक :– मालकाप्रमाणे गुलामगिरी ही प्रथा गुलामासही लाभदायक आहे. गुलामामध्ये जन्मतः बुद्धी, ज्ञान, संयम इ. चा अभाव असतो त्यामुळे त्यांना मालकाच्या मार्गदर्शनात राहणे योग्य आहे. त्याप्रमाणे आई-वडिलांच्या मार्गदर्शनाशिवाय मुलांचा विकास होत नाही. तसाच मालकाच्या मार्गदर्शनाशिवाय गुलामाचा विकास होत नाही.

Scanned with CamScanner

(7) समाजास लाभदायक :- गुलामगिरीची प्रथा मालक गुलामाप्रमाणेच समाजासाठी हितकारक आहे. या प्रथेमुळे बुद्धिमान लोकांचा समाजासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेता येतो. घरकामामुळे किंवा शारिरिक कामामुळे बुद्धीमान लोकांना श्रम करावे लागत नाही. म्हणून समाज सेवा मन लावून करतील असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(8) उपयुक्ततेचा आधार / दासप्रथेच्या अभावामुळे उत्पादन कार्यात अडथळा निर्माण होईल :- गुलामगिरीच्या प्रथेचा नायनाट केला तर उत्पादन कार्यामध्ये अडथळा निर्माण होईल अशी भिती ॲरिस्टॉटलला वाटत होती. त्यामुळेच उपयुक्ततेचा आधार घेवून त्यांनी गुलामगिरीचे समर्थन केले आहे. सामाजिक शौर्य, कौटुंबिक विकास, आर्थिक समृद्धी यासाठी दासप्रथा ग्रीकमध्ये उपयुक्त ठरली आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(9) दासप्रथा नैतिक आहे :- ॲरिस्टॉटल नैतिकदृष्टयाही दासप्रथा आवश्यक मानतो. नैतिकदृष्टया दोघामध्ये भेद आहे. मालक 'गुणी' आणि गुलाम 'गुणहीन' असतात. मालकाचे कर्तव्य गुलामाशीच स्नेहपूर्वक किंवा प्रेमाने वागणे आणि गुलामाचे कर्तव्य मालकाच्या आज्ञेचे पालन करणे हे आहे.

(10) गुलामाचे प्रकार :- ॲरिस्टॉटलने गुलामाचे
(1) नैसर्गिक किंवा स्वाभाविक गुलाम
(2) वैधानिक गुलाम असे दोन प्रकार सांगितले

(1) नैसर्गिक गुलाम :- ज्या व्यक्ती निसर्गतः बुद्धीहीन, अकुशल, अयोग्य मानतात त्या व्यक्तींचा समावेश नैसर्गिक गुलाममध्ये होतो.

(2) वैधानिक गुलाम :- युद्धात जिंकून आणलेल्या व्यक्तींना किंवा परकीय संस्कृतीच्या व्यक्तींना गुलाम बनविले जाते होते; अशा गुलामांना ॲरिस्टॉटल वैधानिक गुलाम मानतो.

(11) गुलामगिरीच्या प्रथेबाबत ॲरिस्टॉटलने केलेल्या सूचना | किंवा क्रूर / पारंपारिक दासप्रथेला विरोध :- ॲरिस्टॉटलने पारंपारिक किंवा क्रूर गुलामगिरीच्या पद्धतीला विरोध केला आहे. त्या क्रूर प्रथेमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी काही सूचना केली आहे.

1) गुलामांची संख्या मर्यादित असावी.
2) गुलामावर मालकांनी अन्याय अत्याचार करू नये.
3) गुलामासोबत मालकांनी क्रूर व्यवहार करू नये
4) मालक व गुलामात जिव्हाळ्याचे संबंध असावेत.
5) गुलामाच्या क्षमतेनुसार त्याच्याकडून काम करून घ्यावे
6) गुलामांना शारिरीक, भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्या.
7) दासप्रथा ही वंशपरंपरागत आधारित नसावी असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे त्यांनी गुलामगिरीचा / दासप्रथेचा विचार मांडला आहे.

गुलामगिरी / दासप्रथेतील दोष / उणिवा :-

(1) लोकशाहीच्या विरुद्ध :- ॲरिस्टॉटलने गुलामगिरी प्रथेचे समर्थन करुन स्वातंत्र्य व समता या लोकशाही तत्वाला कोणतेच स्थान ठेवले नाही, त्यामुळे गुलामगिरी ही लोकशाहीच्या विरुद्ध आहे असे टिकाकारांचे मत आहे.

(2) अनैसर्गिक प्रथा :- ॲरिस्टॉटलच्या मते निसर्गतःच काही व्यक्ती बुद्धीमान तर काही बुद्धीहीन असतात. परंतु त्यामध्ये स्पष्ट सिमारेषा नाही. बुद्धीमान आणि बुद्धीहीन यांच्या कसोटीबाबत तो मौन बाळगतो त्यामुळे ही प्रथा अनैसर्गिक वाटते.

(3) व्यक्तींचे विभाजन करणे अशक्य :- ॲरिस्टॉटलने बुद्धीच्या आधारावर बुद्धीहीन आणि बुद्धीमान असे विभाजन केले आहे परंतु असे विभाजन करणे अशक्य आहे. त्यामुळे केवळ दोन विभागामध्ये वर्गीकरण करणे योग्य नाही असे टिकाकारांचे मत आहे.

(4) गुलाम व मालकाचा निर्णय कोण देईल :- ॲरिस्टॉटलच्या मते बुद्धीच्या आधारावर गुलाम व मालक निश्चित होतील परंतु हा व्यक्ती गुलाम आहे किंवा हा व्यक्ती मालक आहे याचा निर्णय कोण देईल याबाबत त्यांनी मौन बाळगले आहे.

(5) शारिरिक श्रमाला हिन समजणे अयोग्य :- ॲरिस्टॉटलने बुद्धी नसणाऱ्यांनी शारिरीक श्रम करावे. मालकांच्या आज्ञेचे पालन करावे असे मत मांडले. परंतु व्यावहारिकदृष्ट्या विचार करता शारिरीक श्रम करणाऱ्या व्यक्तींना हिन समजणे म्हणजे अवमुल्यन करणे अयोग्य आहे.

प्रश्न- मॉन्टेस्क्यूच्या गुलामगिरीसंबंधीचे विचार स्पष्ट करा?

प्रश्न- मॉन्टेस्क्यूचे संपत्ती व कुटुंबसंबंधीचे विचार स्पष्ट करा - 20 marks

सोमवार
23/1/06

(6) नैसर्गिक सिद्धांत :- मॉन्टेस्क्यूच्या मते मालक आणि गुलाम यांचे संबंध मैत्रीचे असावेत असे आहे परंतु मैत्री समान विचारांच्या समान व्यक्तिमत्त्वांच्या लोकांमध्ये होते. हे मॉन्टेस्क्यूने विसरले आहे त्यामुळे त्याचा विचार नैसर्गिक वाटतो.

याप्रकारे परिणामी मॉन्टेस्क्यूने समर्थन केलेल्या गुलामगिरीच्या प्रथेमध्ये दोष दिसून येतात.

IMP 10 marks

* मॉन्टेस्क्यूचे संपत्तीसंबंधीचे विचार

1) प्रस्तावना

2) संपत्तीसंबंधी विचार :-

(1) संपत्तीचे समर्थन :- मॉन्टेस्क्यूने संपत्तीचे समर्थन केले आहे. चांगले जीवन जगण्यासाठी व्यक्तीचे कल्याण करण्यासाठी व्यक्तीच्या जीवनात सुख, शांती, समाधान निर्माण होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला संपत्ती बाळगण्याचा अधिकार असावा. प्लेटोने मात्र आपल्या आदर्श राज्यात सैनिकी व शासक वर्गाला संपत्तीपासून दूर ठेवले होते परंतु मॉन्टेस्क्यूने मात्र समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी, वर्गासाठी संपत्ती अत्यंत आवश्यक आहे मत मांडले. व्यक्तिगत संपत्ती मनुष्यामध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण करते. संपत्तीशिवाय सुसंस्कृत कुटुंबाची कल्पना करणे शक्य नाही असे मॉन्टेस्क्यूचे मत आहे.

(2) प्लेटोच्या संपत्तीच्या साम्यवादावर टीका :-

प्लेटोने आपल्या रिपब्लिक ग्रंथामध्ये आदर्श राज्याच्या संकल्पनेत सैनिकी व शासक वर्गासाठी

Scanned with CamScanner

संपत्तीचा साम्यवाद मान्य केला होता. परंतु तो विचार ॲरिस्टॉटलला मान्य नव्हता. प्लेटोच्या या विचारावर ॲरिस्टॉटलने टिका केली आहे ती खालीलप्रमाणे

1) संपत्तीमुळे आत्मसन्मान व आनंद मिळतो.
2) संपत्ती बाळगणे हा व्यक्तीचा स्वाभाविक गुणधर्म आहे.
3) प्लेटोच्या या विचारामुळे समाजात भेदभाव निर्माण होतो
4) परिश्रमी व्यक्तीच्या प्रोत्साहनाची समाप्ती होते.
5) वैयक्तिक लाभ मिळत नाही.
6) ऐतिहासिकदृष्ट्या तो चुकीचा आसून अव्यवहारिक आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(3) संपत्तीचे प्रकार :- ॲरिस्टॉटलने संपत्ती चे दोन प्रकार सांगितले (1) सजीव संपत्ती (2) निर्जीव संपत्ती. सजीव संपत्तीमध्ये - गुलाम, पशू-पक्षी, जनावरे यांचा समावेश होतो. तर निर्जीव संपत्तीमध्ये - घर, शेती, सोने, चांदी, पैसा इ. चा समावेश होतो. दोन्ही प्रकारची संपत्ती एका सुखी समृद्ध कुटुंबासाठी आवश्यक आसते, या संपत्तीशिवाय कुटुंबामध्ये शांतता, सुख निर्माण होऊ शकत नाही. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(4) संपत्ती संचयाला विरोध :- ॲरिस्टॉटलच्या मते संपत्ती व्यक्तीच्या सुखी जिवनासाठी, कल्याणासाठी आवश्यक आहे असा विचार मांडला असला तरी संपत्तीचा आत्याधिक संचय ॲरिस्टॉटलला मान्य नाही, अमर्याद संपत्तीला तो विरोध करतो. एकीकडे संपत्ती एक गुण आहे नैसर्गिक गरज आहे. असा मत मांडले असले तरी दुसरीकडे संपत्ती

एक दोषयुक्त आहे. त्यांचा अधिक संचय करणे हा एक शाप आहे. वेडयासारखे संपत्तीच्या मागे लागणे, हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे लक्षण नव्हे. संपत्ती साध्य नसून एक साधन आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

5) संपत्ती प्राप्तीचे मार्ग :- ॲरिस्टॉटलने संपत्ती प्राप्त करण्याचे दोन मार्ग सांगितले आहेत 1) नैसर्गिक मार्ग 2) अनैसर्गिक मार्ग

1) नैसर्गिक मार्ग :- प्रत्यक्ष श्रम करून संपत्तीचे उत्पादन करण्याच्या पद्धतीला नैसर्गिक मार्ग म्हणतात. उदा- पशुपालन, शेती उत्पादन

2) अनैसर्गिक मार्ग :- जेव्हा कष्ट करून उत्पन्न केलेल्या वस्तूचा विनिमय करून नफा मिळविणे, मोड वजावट व्याज घेणे, व्यापार, उद्योगधंद्याद्वारे नफा कमविणे म. संपत्ती मिळविण्याचे मार्ग अनैसर्गिक आहेत.

ॲरिस्टॉटलच्या मते नैसर्गिक मार्गानेच संपत्ती प्राप्त करणे योग्य मार्ग उचित आहे. अनैसर्गिक मार्गाचा अवलंब करणे अनुचित आहे.

6) संपत्ती वितरणाचे प्रकार :- ॲरिस्टॉटलने संपत्ती वितरणाचे तीन प्रकार सांगितले आहेत.

1) व्यक्तिगत अधिकार व सार्वजनिक उपभोग
2) सार्वजनिक अधिकार व व्यक्तिगत उपभोग
3) सार्वजनिक अधिकार व सार्वजनिक उपभोग

ॲरिस्टॉटलने यापैकी पहिल्या प्रकाराचे समर्थन केले आहे. प्लेटोने तिसऱ्या प्रकाराचे समर्थन केले आहे. दुसऱ्या प्रकारात कोणतीही मान्यता दिली

नाही. कारण तो अनैतिक आहे.
आशाप्रकारे ॲरिस्टॉटलने वरिलप्रमाणे संपत्तीसंबंधी विचार मांडला आहे.

*** कुटुंबासंबंधीचे विचार :—** <u>10 mark</u>

1) प्रस्तावना :—

2) कुटुंबासंबंधीचे विचार :—

(1) कुटुंबाचे समर्थन :— ॲरिस्टॉटलने कुटुंबाचे समर्थन केले आहे त्याचे कुटुंबाच्या संबंधीचे विचार प्लेटोच्या विरुद्ध आहेत. ॲरिस्टॉटल कुटुंबाला उचित, आवश्यक मानतो. कुटुंब स्वाभाविक आहे कुटुंब हे त्रिकोणात्मक संबंधाचे स्वरूप आहे. पती-पत्नी, स्वामी-दास आणि माता-पिता-मुले या तिघांच्या परस्पर संबंधाचे नाव कुटुंब आहे. कुटुंबाच्या प्रमुखाचे वर्चस्व कुटुंबातील व्यक्तीवर, संपत्तीवर असते असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(2) कुटुंब नागरि जीवनाची प्रथम पाठशाळा आहे:— ॲरिस्टॉटलच्या मते कुटुंब नागरिक व सामाजिक जीवनाची प्रथम पाठशाळा आहे सामाजिक जीवनाच्या मध्य मंदिराची कुटुंब आधारशिला आहे. कुटुंब मानवतेची आधी पाठशाळा आहे की त्यामध्ये सहकार्य, सहानुभूती, आपुलकी, स्नेह, त्याग इ. नैतिकतेचे धडे शिकवले जातात. तसेच सत्य-असत्य, न्याय-अन्याय यामध्ये अंतर करण्याचे आज्ञापालन, अनुशासन करण्याचे शिक्षणही दिले जाते.

(3) कुटुंबाचे विकसित रूप म्हणजे राज्य :—

Scanned with CamScanner

ॲरिस्टॉटलच्या मते मानवी संस्थेचे अंतिम व पूर्ण रूप म्हणजे राज्य होय. या विकासात प्रक्रियेमध्ये कुटुंबाला प्रथम स्थान देण्यात येते. पतिपत्नी, स्त्री-पुरुष वगैरे लोक कुटुंबामध्ये संघटित झाले. अनेक कुटुंब एकत्र येवून खेड्याची निर्मिती झाली व अनेक खेडे एकत्र येवून राज्याची निर्मिती झाली आहे. यामुळेच कुटुंबाचे विकसित रूप म्हणजेच राज्य होय. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(4) कुटुंबाचे स्वरूप पितृसत्ताक :- ॲरिस्टॉटलने पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे समर्थन केले आहे. कुटुंबाची सर्व सत्ता पित्याच्या किंवा वृद्ध पुरुषाच्या हातामध्ये असते. तो व्यक्तीचा कुटुंबाचा संचालक व शासक असतो. त्याचेच नियंत्रण कुटुंबावर असते. सर्व कार्याची त्याच्यावर जबाबदार धरले जाते. स्त्रिया ~~बालक~~ वृद्ध पुरुषाचे नियंत्रण असायला हवे तसेच गुलामावर, ~~कुटुंबांवर~~ महिला मुला-मुलींवर पित्याचे नियंत्रण असावे असे त्याचे मत आहे.

(5) मैत्रीपूर्ण वातावरण :- ॲरिस्टॉटलने पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे समर्थन करून कुटुंबामध्ये पुरुषांचे वर्चस्व कठोर अनुशासन असले तरी. ही त्याच्यात व इतर कुटुंबातील व्यक्तीत मैत्रीपूर्ण वातावरण असणे आवश्यक आहे. पत्नी, मुले, गुलाम यांच्यासोबत मैत्रीचा व्यवहार करणे आवश्यक आहे. एकदुसऱ्यांच्या सहकार्याने दैनिक, नैतिक, भौतिक गरजांची पूर्तता होते.

(४) प्लेटोच्या कुटुंबासंबंधीच्या साम्यवादावर टिका :-

(6) स्त्रियांची स्थिती :- ॲरिस्टॉटलने कुटुंबाचे समर्थन केले असले तरी त्यांची स्त्रीयांबद्दलची धारणा उच्च नाही. तो स्त्रीयांना पालना वडील भनेची पुरुष मानतो, स्त्रियांचे कार्यक्षेत्र घराच्या चार भिंतीतच असले पाहिजे. असे त्याचे मत आहे स्त्री एक अपुर्ण पुरुष आहे. आणि गप्प बसणे हेच तिचा गौरव आहे. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. ती शासन करण्यास अयोग्य आहे. तिच्यावर पुरुषाचे नियंत्रण असले पाहिजे. असे त्यांचे मत होते. थोडक्यात प्लेटोने चार भिंतीच्या बाहेर काढलेल्या स्त्रीला ॲरिस्टॉटलने पुन्हा चार भिंतीमध्ये टाकले आहे असे आपणास म्हणता येईल

(7) कुटुंबावर राज्याचे नियंत्रण :- ॲरिस्टॉटलच्या मते, कुटुंबाच्या मोहामुळे पुरुषांचे मार्ग विचलित होतात, त्यामुळे कुटुंबावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही नियम तयार केले पाहिजेत. तसेच लोकसंख्या कमी किंवा जास्त करण्यासाठी उपाय करणे आवश्यक असते. हे सर्व नियंत्रण किंवा उपाय राज्याने करावेत असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. तसेच ॲरिस्टॉटलने विवाहाच्या बाबतीमध्ये विचार मांडताना विवाहाच्या वेळी स्त्रीयांचे वय 18 वर्षे व पुरुषांचे वय 37 वर्षा पेक्षा कमी असू नये. असे मत मांडले आहे.

थोडक्यात ॲरिस्टॉटलचे कुटुंबासंबंधीचे विचार प्लेटोच्या विचारापेक्षा वेगळे आहेत. त्यांच्या या विचारात अनेक दोषही दिसून येतात. त्यामध्ये

(1) स्त्रीयांना कनिष्ठ मानणे अयोग्य :-

(२) पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे समर्थन करतो-चुकीचे.
(४) स्त्री पुरुषामधील भेदभाव.
(५) विवाहामध्ये विसंगती इ. दोषही त्यांच्या या विवाहामध्ये दिसून येतात.

Imp 20 marks

टिपा द्या - नागरिकत्व - ॲरिस्टॉटल 10 marks

## * ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वासंबंधीचा विचार :-

(१) प्रस्तावना -

(२) नागरिकत्वासंबंधीचा विचार :- ॲरिस्टॉटलने आपल्या पॉलिटिक्स ग्रंथाच्या तिसऱ्या भागात नागरिकत्वाचा विचार मांडला आहे. हा विचार मांडताना त्यांनी राज्याला 'कुनोनिया' हा शब्दप्रयोग वापरला आहे. राज्यामधील सर्व व्यक्तींना नागरिक म्हणता येणार नाही. नागरिकत्व कोणास देण्यात यावे. याबद्दल विचार मांडताना नागरिक कोण नाहीत? याचा विचार तो आगोदर मांडतो. त्याच्या मते राज्यात राहतो तेच कोणी नागरिकत्वाचे एकमेव लक्षण नाही. नागरिकत्वासाठी केवळ राज्यातील वास्तव्य, कायदा, जन्म इतकी मर्यादा पुरेशी नसून त्यामध्ये कामगिरी (कार्य) संबंध महत्वाचा आहे

(३) नागरिकत्व कोणास नाही :- नागरिकत्व कोणकोणत्या व्यक्तींना देता येणार नाही याचा विचार त्यांनी खालीलप्रमाणे मांडला आहे

1) एखाद्या ठिकाणी दिर्घकाळ वास्तव्य केल्यामुळे नागरिकत्व प्राप्त होत नाही
2) स्त्रीयांना नागरिकत्व देण्यात येवू नये
3) विद्यार्थी, लहान मुले यांना नागरिक म्हणू नये
4) गुलामांना परकीय व्यक्तींनाही नागरिकत्व मिळणार नाही.

5) ज्या व्यक्तींचे आई-वडिल दुसऱ्या देशाचे नागरिक आहेत. अशा व्यक्तींनाही नागरिकत्व देवू नये. आहे

6) श्रमिक वर्ग, शेतकरी, व्यापारी, कारखानदार, व्यावसायिक यांनाही नागरिकत्व देण्यात येवू नये

7) नागरिकत्व अनुवंशिकतेनेही प्राप्त होणार नाही.

8) ज्या व्यक्तीला राज्याकडून हद्दपार करण्यात आले आहे अशा व्यक्तींनाही नागरिकत्व प्राप्त होणार नाही. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

4) नागरिकत्वाचा अर्थ / व्याख्या :- ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाचा अर्थ असा सांगितला आहे की, "नागरिक म्हणजे अशी व्यक्ती की जी न्याय प्रशासनात आणि व्यवस्थापिकेच्या सदस्य या नात्याने कायदे निर्मितीमध्ये भाग घेते त्यास नागरिक म्हणतात." या दोन्ही कार्यामध्ये किंवा एका कार्यामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तीलाच नागरिकत्व प्राप्त होते असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

5) न्यायालयीन व प्रशासकीय कार्यात भाग घेणाऱ्यास नागरिकत्व :- ॲरिस्टॉटलच्या मते जो व्यक्ती राज्याच्या किंवा नगराच्या न्यायालयीन व प्रशासकीय कार्यामध्ये भाग घेतो त्यास नागरिकत्व देण्यात यावे. हे एक नागरिकत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. ॲरिस्टॉटलच्या काळात नगर राज्याच्या न्यायालयाचे स्वरूप आजच्यापेक्षा वेगळे होते. नगरामध्ये अनेक लहान लहान न्यायालय होती. त्या न्यायालयामध्ये अनेक न्यायाधीश निवडले जात होते. यामुळे नागरिक अनेक लोकांना

न्यायाधीश होण्याची संधी प्राप्त होत होती.

(ब) कायदेविषयक / राजकीय (सत्तेत भाग) घेणाऱ्यास नागरिकत्व :- हे ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, न्यायालय, सभेचा सदस्य या नात्याने विधीविषयक कार्यामध्ये जी व्यक्ती भाग घेते, त्या व्यक्तीस नागरिकत्व देण्यात यावे, ज्या व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त झाले आहे, ती व्यक्ती त्याकाळी विधीमंडळाचे सभासद किंवा सदस्य असत.

(क) नागरिकत्वासाठी पात्रता :- ॲरिस्टॉटलच्या मते नागरिकत्वासाठी योग्य पात्रतेची आवश्यकता असते आणि ही पात्रता त्याच व्यक्तीजवळ असू शकते. त्याच्याजवळ वेळ आहे किंवा जो त्याच्याकडे अवकाश आहे. (रिकामपणा) तसेच ॲरिस्टॉटल आहेही म्हणतो की, जो दुसऱ्यांना आज्ञा करू शकतो, तर दुसऱ्या आज्ञेचे पालन करू शकतो त्याला नागरिक म्हणावे. गुलाम-श्रमिक, विद्यार्थी, स्त्रिया, शेतकरी, व्यापारी यांच्याकडे रिकामा वेळ नसल्यामुळे ॲरिस्टॉटलने त्यांना नागरिकत्व दिले नाही. रिकामपणाचा अर्थ केवळ सुट्टी, विश्रांती नव्हे तर ते एकप्रकारचे कार्य आहे आहे ॲरिस्टॉटलचे मत आहे या कार्याला तो दोन भागामध्ये विभागतो.

1) साधन स्वरूप करावयाचे कार्य

2) साध्य स्वरूप करावयाचे कार्य

(1) साधन स्वरूप करावयाचे कार्य / साधनरूपी कार्य :- जी कार्ये विशिष्ट उद्देश प्राप्त करण्याचे

(२) सोद्देशजन्य कार्य – याशिवाय काही कार्य सामान्य साधु संतांना जसे कायद्याच्या उद्देशाने व्यक्ती कार्य करते. जनजागृती, साहित्य निर्मिती, समाजसेवा इ. त्याला उद्देशजन्य कार्य म्हणतात.

(३) चांगला नागरिक व चांगली व्यक्ती यातील फरक:- प्लेटोने चांगल्या व्यक्तीला ~~चांगला~~ चांगला नागरिक मानले आहे. परंतु ॲरिस्टॉटल-नी या मताचे समर्थन केले नाही. ॲरिस्टॉटलच्या मते चांगल्या व्यक्तीचे गुण नेहमी सारखे असतात पण चांगल्या नागरिकांचे गुण बदलत्या संविधानानुसार बदलत जातात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे

~~बदलत जातात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे~~

थोडक्यात सांगायचे तर प्लेटोने सिद्धांतवादावर भर दिला आहे तर ॲरिस्टॉटलने व्यवहारवादावर भर दिला आहे.

* नागरिकत्वासंबंधीच्या विचारातील दोष / टिका

(१) संकुचित व्याख्या / अर्थ:– ॲरिस्टॉटलची नागरिकत्वाची केलेली व्याख्या अत्यंत संकुचित आहे कारण न्यायिक, प्रशासकीय व कायदा निर्मिती यामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तीलाच तो नागरिक म्हणतो परंतु राजेशाही, कुलीनतंत्रासारख्या राज्यामध्ये खूपच कमी लोकांना नागरिकत्व मिळेल म्हणून टिकाकारांचे मत आहे

(२) लोकशाहीशी विसंगत:– आधुनिक लोकशाही मध्ये ॲरिस्टॉटलचा नागरिकत्वासंबंधीचा विचार मान्य होत नाही कारण आपले युग अप्रत्यक्ष लोकशाहीचे आहे. त्यामध्ये सर्वच व्यक्ती कायदे तयार करण्यात किंवा न्यायदान कार्यामध्ये भाग घेत नाहीत

Scanned with CamScanner

यामुळे हा विचार विसंगत वाटतो.

(3) गुलाम व स्त्रियांचा अभाव :- ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वासंबंधीच्या विचारात स्त्रियांना, गुलामांना दूर ठेवले आहे यामुळे समाजात असमानता निर्माण होते असे टिकाकारांचे मत आहे.

(4) बहुसंख्य वर्गाकडे दुर्लक्ष :- ॲरिस्टॉटलनी राज्यातील काही वर्गानाच नागरिकत्व दिले आहे जास्तीत जास्त लोकांना नागरिकत्वापासून दूर ठेवले आहे. त्यांच्या विकासाची दारे बंद केली आहेत. काही टिकाकारांचे मत आहे.

(5) अनेक गटांचा व वर्गाचा उदय होईल :- ॲरिस्टॉटलच्या या विचारामुळे किंवा असमानतेमुळे समाजामध्ये नागरिकत्व मिळणाऱ्यांचा एक गट व नागरिकत्व न मिळणाऱ्यांचा दुसरा गट निर्माण होईल. या गटबाजीमुळे अशांतता, गोंधळ गडबड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(6) मोठ्या राज्यासाठी अयोग्य :- लहान नगराज्याच्या दृष्टीने हा विचार योग्य असला तरी मोठ्या राज्यासाठी तो अयोग्य आहे कारण मोठ्या राज्याची लोकसंख्या जास्त असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांचा समावेश शासन कार्यात होवू शकत नाही किंवा ते शक्यही नाही.

(7) सेंद्रिय सिद्धांताशी विसंगत :- ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या सेंद्रिय सिद्धांतानुसार राज्यातील व्यक्ती म्हणजे राज्यरूपी शरीराचे सर्व अवयव होत. परंतु या ठिकाणी तो लोकसंख्येचा बराच मोठा

भाग नागरिकत्वापासून दूर ठेवून राज्याच्या अवयव बनण्यापासून वंचित ठेवला आहे. हे त्याच्या केंद्रिय सिद्धांताशी विसंगत आहे.

(8) स्त्रियांना नागरिकत्व न देणे अयोग्य आहे:- ॲरिस्टॉटलच्या मते स्त्रियांना लहानपणी आई वडिलांच्या नियंत्रणात, लग्नानंतर नवऱ्याच्या नियंत्रणात असते. यामुळे तिला नागरिकत्वाचा अधिकार दिला जात नाही. परंतू स्त्री ही एक राज्या मधील एक महत्वपूर्ण घटक आहे. स्त्रीयांना नागरिकत्वापासून दूर ठेवणे अयोग्य आहे. यामुळे स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव, विषमता निर्माण होते आशा-प्रकारे वरीलप्रमाणे ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वासंबंधीच्या विचारात दोष दिसून येतात.

Imp 20mark (99.9%) Mahatval

* ॲरिस्टॉटलच्या क्रांती संबंधीचा विचार :-

(1) प्रस्तावना -

(2) क्रांतीसंबंधीचे विचार :- ॲरिस्टॉटलच्या क्रांतीवि-षयक दृष्टीकोन अत्यंत वास्तववादी किंवा व्यवहारवादी आहे. त्यामुळेच त्याला पहिला राजकीय तत्वज्ञ मानतात. ग्रीक नगर राज्यामध्ये जी वारंवार-जे परिवर्तन होत होते त्याचा अभ्यास करुन त्याने क्रांतीसंबंधीचे कारणे व उपाय सांगितलेली आहेत. ते विचार आजच्या काळामध्येही मार्गदर्शक ठरले आहेत. ॲरिस्टॉटलचे मोठेपणा त्यांनी क्रांतिसंबंधी सांगितलेल्या कारणामध्ये नव्हे तर त्यावर त्याने सुचवलेल्या उपाय-योजनेत आहे.

(3) क्रांतीचा अर्थ :- ॲरिस्टॉटलने क्रांतीचा अर्थ सविस्तर सांगितलेला आहे. आजच्या क्रांतीचा अर्थ आणि त्याने सांगितलेला अर्थ यामध्ये खूपच फरक आहे. कोणत्याही राज्यात जनतेद्वारे किंवा एखाद्या गटाद्वारे सशस्त्र, विद्रोह किंवा बंड याला क्रांती म्हटले जाते. परंतु ॲरिस्टॉटलला एवढा संकुचित अर्थ मान्य नाही. ॲरिस्टॉटलच्या मते ज्याप्रमाणे क्रांती हिंसक पद्धतीने होते, त्याचप्रमाणे अहिंसक पद्धतीने निवडणुकीच्या माध्यमाने क्रांती होवू शकते. संविधानात बदल किंवा परिवर्तन याला ही क्रांतीच म्हणतो. राज्यघटनेमधील छोटा छोटा बदल किंवा संशोधन, एखादी शासनपद्धती जावून दुसरी शासनपद्धती स्विकारणे याचाही समावेश राज्यक्रांतीतच होतो. केवळ राज्यकर्त्यांमध्ये बदल झाल्यास त्यालाही तो क्रांती म्हणतो. एवढेच नव्हेत राज्यकर्त्याचा उद्देश किंवा हेतू बदलला तरी त्याला क्रांतीच म्हणावे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(4) क्रांतीचे प्रकार / वर्गीकरण :-

1) आंशिक व संपूर्ण क्रांती :- जेंव्हा संपूर्ण राज्यघटनेत बदल होतो किंवा शासनव्यवस्थेत बदल होतो तेंव्हा त्याला 'संपूर्ण क्रांती' म्हणतात. तसेच राज्यघटनेच्या एखाद्या भागामध्ये बदल होतो, तेंव्हा त्याला 'आंशिक क्रांती' म्हणतात.

2) रक्तमय व रक्तविहीन क्रांती :- जेंव्हा शासनामध्ये किंवा संविधानामध्ये बदल होताना सशस्त्र विद्रोहामुळे किंवा रक्तपात पद्धतीने बदल

होतो तेंव्हा त्याला 'रक्तमय क्रांती' म्हणतात व रक्तपाताशिवाय शांततेच्या मार्गाने बदल आल्यास त्यास 'रक्तविहीन क्रांती' असे म्हणतात

3) व्यक्तीगत आणि गैरव्यक्तीगत क्रांती:- संविधानामध्ये परिवर्तन न करता फक्त शासनामधील एका व्यक्तीला किंवा व्यक्तीसमुहाला पदच्युत करण्यात येते तेंव्हा त्याला 'व्यक्तीगत क्रांती' म्हणतात. तसेच शासनामध्ये बदल न करता केवळ राज्यघटनेमध्ये बदल केला जातो. त्याला 'गैरव्यक्तीगत क्रांती' म्हणतात.

4) वर्गविशेषाविरुद्ध क्रांती:- राज्यामधील गरीब व्यक्तीच्या वर्ग राजतंत्र किंवा धार्मिक नेत्यांच्या विरुद्ध क्रांती करतो किंवा श्रीमंत व्यक्तीचा वर्ग जनतंत्राच्या विरुद्ध क्रांती करतो, तेव्हा त्याला 'वर्ग विशेषाविरुद्ध क्रांती' असे म्हणतात.

5) वक्त्याची क्रांती:- जेंव्हा एखाद्या राज्यात काही वक्ते शब्दांचे जाळे पसरुन आपली महत्वकांक्षा पुर्ण करण्यासाठी म्हणून राज्यामध्ये क्रांती घडवून आणतात, तेंव्हा त्या क्रांतीला 'वक्त्याची क्रांती' असे म्हणतात.

(5) क्रांतीची कारणे:- ॲरिस्टॉटलनी क्रांतीचे कारणे सांगताना दोन भागात विभाजन केले आहेत (1) क्रांतीची सामान्य कारणे (2) क्रांतीची विशिष्ट कारणे

1) क्रांतीची सामान्य कारणे

① अन्यायाची जाणीव :- व्यक्तीवर अन्याय अत्याचार होत असेल तर, ~~अ~~ व्यक्ती त्याविरुद्ध क्रांती करतो.

② आर्थिक विषमता :- विशिष्ट वर्गाच्या हातात आर्थिक सत्ता गेल्यामुळे गरिबावर अन्याय होतील ही विषमता दूर करण्यासाठी क्रांती घडते.

③ सत्तेसाठी स्पर्धा :- आज सत्तेसाठी अनेक पक्ष धडपडत असतात व या स्पर्धेतही कुटिल मार्गाचा अवलंब केला जातो व त्यामुळे क्रांतीचा मार्ग अवलंबला जातो.

④ सत्तेचा दुरुपयोग :- शासन करणारे व्यक्ती सत्तेचा दुरुपयोग करतात. त्यामुळे गरिबावर अन्याय होतो व ते त्यासाठी क्रांती करतात.

⑤ प्रादेशिक असमतोल :- एखाद्या भागाला जास्त सोयी सवलती देणे म्हणजे त्या भागाच्या जास्त विकास करणे यामुळे विरोधातही क्रांती केली जाते.

⑥ परस्पर विरोधी विचारप्रणाली :- दोन राष्ट्रातील विचार हे वेगवेगळे असतील तर त्यांच्यामध्ये क्रांती निर्माण होते. या दोन राष्ट्रात फूट पडते व दोघांची विचारप्रणाली ही परस्पर विरोधी बनते.

⑦ शासक वर्गाचा बेजबाबदारपणा :- शासन चालवण्यासाठी योग्य शासक वर्ग असावा लागतो स्वार्थी न राहता जनतेचे कल्याण करण्यास टाळाटाळ. नंतर अन्याय होत असेल तर जनता त्यांच्याविरुद्ध क्रांती करते

⑧ नोकरशाहीची भावना :- शासनामध्ये अनेक पदांची निर्मिती केली जाते. यातील वरिष्ठ अधिकारी हा कनिष्ठ अधिकाऱ्यावर अन्याय करतो व तो कनिष्ठ त्या विरुद्ध क्रांती करतो.

Scanned with CamScanner

(9) निवडणूकीमधील कारस्थाने :- सार्वजनिक नि-
वडणुकात अनेक प्रकारे कारस्थाने रचून
विशिष्ट व्यक्तींना निवडून दिले जाते. त्यामुळे व्यक्ती
त्याविरुद्ध क्रांती करतो.

(10) कौटुंबिक संघर्ष :- प्रत्येक कुटुंबात काही प्रमाणात
संघर्ष आपल्याला दिसून येतो यातूनही अनेक
कारणे असतात त्यातूनही क्रांतीची निर्मिती होते.

(11) परदेशी व्यक्तींचा मुक्त प्रवेश :- परदेशातील
व्यक्ती आपल्या देशात येऊन मुक्त व्यवसाय
करतो त्या व्यक्तींच्या विरोधात क्रांती केली जाते.

इ. ॲरिस्टॉटलची क्रांतीची सामान्य कारणे म्हणून उ-
ल्लेख केला जातो.

(2) क्रांतीची विशिष्ट कारणे :- ॲरिस्टॉटलनी
क्रांतीच्या सामान्य कारणाबरोबर प्रत्येक
शासनव्यवस्थेचा विचार करून त्या शासनातील
विशिष्ट कारणाचाही उल्लेख त्यांनी केला आहे.

(i) राजेशाहीमधील क्रांतीची कारणे :-

*(1) कौटुंबिक संघर्ष

(2) परस्पर सत्तेसाठी स्पर्धा

*(3) द्वेष मत्सर व धाडसातील एकमेकांचा तिरस्कार

(4) प्रजेला मिळणारी अन्यायकारक अपमानास्पद वागणूक

(5) जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते

(6) शेजारी राज्याचा त्रास वाढतो

इ. कारणामुळेही राजेशाहीमध्ये जनता
क्रांतीसाठी प्रभावित होते.

(2) कुलीनशाही / महाजनशाहीमधील क्रांती :-

*① महाजनशाहीमध्ये कनिष्ठ वर्गाची उपेक्षा होते
*② मर्यादित लोकांनाच पदाची व प्रतिष्ठेची प्राप्ती होते
*③ भिन्न भिन्न वर्गात सामान्यजनांचा विरोध
④ शासनकाळात भ्रष्टाचार केला जातो
⑤ पुरोहितांना अन्याय अत्याचार | अपमानास्पद वागणूक

3) लोकशाहीमधील क्रांती :-
① सत्तेचा दुरुपयोग
② अयोग्य व्यक्तींची निवड
③ शासनातील भ्रष्टाचार
④ शासनकाळात अन्याय अत्याचार
⑤ सत्तेसाठी स्पर्धा
⑥ पक्षपातीपणा होतो इ.

4) हुकूमशाहीमधील क्रांती :-
① पुरोहितांना अन्याय अत्याचार
② भ्रष्टाचार व वशिलेबाजीमुळे प्रजा त्रस्त होते.
③ प्रजेस अपमानकारक वागणूक
*④ महत्त्वाच्या पदावरील पदाधिकाऱ्यांचा अपमान
⑤ सत्तेचा दुरुपयोग इ.

5) धनिकसत्तेमधील क्रांती :-
*① श्रीमंत पैसे यांच्या राज्यकर्ते जनतेवर जुलूम व अत्याचार करतात.
*② राजकार्याची लोभी महत्त्वाकांक्षा
*③ आपापसातील शत्रुत्व
*④ श्रीमंत लोक सत्तेसाठी स्पर्धा करतात
⑥ दडपशाही व जनतेचे शोषण वाढते.

Scanned with CamScanner

(6)

## * क्रांतीचे परिणाम :—

1. क्रांतीमुळे राजकीय व्यवस्थेत परिवर्तन होते
2. राजकीय व्यवस्थेमध्ये बदल होतो किंवा राजकीय व्यवस्था नष्टही करून शासनामध्ये बदल होतो
3. संविधानामध्ये अंशतः किंवा पूर्णतः बदल होतो
4. राज्यामध्ये स्थिरता किंवा अस्थिरता निर्माण होते
5. सौम्य किंवा अतिरेकाची विचारधारणेची स्विकारली जाते
6. क्रांतीनंतर नैतिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक मूल्ये बदलतात
7. जबाबदार किंवा बेजबाबदार शासनाची निर्मिती होते.

आशाप्रकारे क्रांतीचे परिणाम दिसून येतात.

(17)

## * क्रांती टाळण्याचे उपाय :—

ॲरिस्टॉटलने क्रांती टाळण्याच्या उपायांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

1. क्रांती टाळण्याचे सामान्य उपाय
2. क्रांती टाळण्याचे विशिष्ट उपाय

### 1. क्रांती टाळण्याचे सामान्य उपाय :—

1. न्याय व संविधानाबद्दल आस्था :— ॲरिस्टॉटलने क्रांती टाळण्यासाठी जनतेची न्याय आणि संविधानाबद्दल आस्था वाढवली पाहिजे असा एक सामान्य उपाय सांगितला आहे जनतेने कायद्याचे पालन करी टिकेल याकडे शासनाने लक्ष द्यावे कारण कायद्याचा आदर केल्याने न्याय प्रस्थापित होतो कायद्याचा भंग करणाऱ्यांना कायदेशीर शिक्षा केल्यास याची राज्यातील

અન્યાયી, અત્યાચારી વાતાવરણ દૂર કરાવે એરિસ્ટોટલચે
મત આહે.
(2) સમતોલ વ્યવહાર :- વિપ્લવ વ ક્રાંતિ ટાળ-
ણ્યાસાઠી સાઠી એરિસ્ટોટલચે મત આહે શાસનાને
કોણાચાહી પ્રજાચ્યા ભેદભાવ ન કરતા સર્વાંના સમાન
સંધી દ્યાવી. એરિસ્ટોટલચ્યા મતે શાસકીય પદાચા
કાર્યકાળ 6 મહિન્યાંચાચ અસાવા. કારણ યા અલ્પ
કાર્યકાળામુળે તો અન્યાય કરુ શકણાર નાહી.
(3) આર્થિક સમતા :- એરિસ્ટોટલચ્યા મતે આર્થિ-
ક વિષમતા દૂર કરણ્યાચા પ્રયત્ન રાજ્યાને કરાવ
સંપત્તીચે યોગ્ય વિતરણ કરાવે, આર્થિક બાબતીતહી
વિષમતા નિર્માણ ઝાલ્યાસ ક્રાંતીચી લાગણ હોણ્યાચા
અસતે. મ્હણૂન સમતેચે વાતાવરણ નિર્માણ કરાવે.
(4) શાસક વ શાસિત યાંચ્યાત સુસંવાદ :- શાસ-
ક વ શાસિત યાંચ્યાત ચાંગલા સંબંધ અસાવા.
શાસકાને જનતેચ્યા સમસ્યા વેળોવેળી સોડવાવ્યાત
તસેચ જનતેની આપલ્યા સમસ્યા શાસનાસમોર માંડા-
વ્યાત યામુળે ક્રાંતી ટળેલ.
(5) શિક્ષણ :- એરિસ્ટોટલચ્યા મતે ક્રાંતી ટાળણ્યા-
ચા સર્વોત્તમ ઉપાય મ્હણજે શિક્ષણ હોય. નાગરિ-
ક જ્યા શાસનપદ્ધતીમધ્યે વાઢતાત, ત્યા શાસનપદ્ધતી-
નીચે શિક્ષણ ત્યાંના દિલે જાવે. ~~ક્રાંત~~ ક્રાંતીચે પરિ-
ણામ ત્યાંના શિક્ષણામધૂન મિળતાત અસે એરિસ્ટો-
ટલચે મત આહે.
(6) સમતોલ વિકેંદ્રીકરણ :- સત્તેચ્યા કેંદ્રીકરણા-
મુળે ક્રાંતી હોતે. મ્હણૂન સત્તા કોણાચાહી [illegible]

व्यक्तींच्या किंवा कंपन्यांच्या हातामध्ये केंद्रीत होवू नये. सत्तेमध्ये अनेक व्यक्तींचा सहभाग असावा. अनेक व्यक्तींच्या सहभागामुळे सत्तेचा दुरुपयोग टाळता येवू शकतो त्यामुळे विकेंद्रीकरणाचा स्विकार करावा असे त्यांचे मत आहे.

(7) लोकनियंत्रित अर्थव्यवस्था :- राज्यातील सार्वजनिक अर्थव्यवस्थेचा प्रत्येक भाग पडताळून पहाण्याचा अधिकार नागरिकांना असावा. यामुळे शासन लोकप्रियता व स्थैर्य प्राप्त होते. जनसंपत्तीचा गैरवापर जनता कधीच सहन करणार नाही. त्यामुळे आर्थव्यवस्थेवर जनतेचे नियंत्रण असावे असे त्यांचे मत आहे.

(8) शासकांची जागृतता :- राष्ट्रातील महत्वाच्या गोष्टींकडे, समस्यांकडे, विकासाकडे शासकाचे लक्ष असावे. प्रस्थापित व्यवस्था विस्कळीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे त्यांचे मत आहे.

(9) विदेशी समस्यांकडे जनतेचे लक्ष केंद्रीत करावे :- शासकाने जनतेचे देशांतर्गत समस्येकडील लक्ष दूर करून विदेशी समस्यांकडे जनतेचे लक्ष केंद्रीत करावे. विदेशी आक्रमणाचे भय दाखवून देशप्रेमाची भावना लोकांमध्ये जागृत करावी. यामुळे जनता अंतर्गत विषमता, अन्याय अत्याचार इ. गोष्टींकडे विशेष लक्ष देणार नाही.

(10) लवचिक संविधान :- संविधान हे जनतेच्या इच्छेच्या अनुकूल असावे. जनतेच्या हिताचा, विकासाचा विचार करावा. ज्या संविधानामध्ये जनतेचा आदर निष्ठा नाही त्या संविधानाविरुद्ध

जनतेमध्ये असंतोष निर्माण होतो. त्यातून संविधानाम-
ध्ये दर्शविल्या गोष्टींचा उद्देश्य कल्याण थांबवा मागे
टेररिझमचे मूळ आहे

वरील उपायांशिवाय क्रांती रोखण्यासाठी खाल-
ील काही उपाय क्रांती विरोधात आहेत त्यामध्ये
① शासकीय भ्रष्टाचार दूर करणे ② योजनांच्या
नूसार व्यक्तींना निःपक्षपातीपणे पदव्या देणे ③ स-
त्तेचा दुरुपयोग टाळणे ④ सद्गुणी शासनकर्ती नेम-
णूक करणे इत्यादींचा समावेश त्यामध्ये होतो.

② क्रांती टाळण्याचे विशिष्ट उपाय :-

① नागरी व दुष्प्रशासनिक उपाय :-

① शासनाने गुप्तहेर खात्याची स्थापना करावी
त्यामध्ये गोपनीयतेची ध्यान देण्यात यावे.

② परकीय आक्रमणाच्या धोका जनतेपासून लपवून ठेवावा

③ आक्रमक धोरण व शस्त्रास्त्र सेना वाढविण्या-
चा प्रयत्न करावा.

④ मोठे आर्थिक साहाय्य करणारे धोरण ठेवावे

⑤ धार्मिक कार्य दुसऱ्यांकडून करून घ्यावे त्यांना
कार्य आपण करून ~~घेतोय असे~~ मिळवावे

⑥ नागरीय महत्त्वाची पदे लोकप्रिय व्यक्तींना
देण्यात यावीत

⑦ संशयीत व्यक्तींना शिक्षा करावी. व त्यांच्या-
ही व्यक्तींना कारागृहामध्ये बंद करावे

म्हणून टेररिझमची थांबवण उपाय सुच-
वले आहेत.

② महानसेना व धार्मिकता :— वरील

जनतेकडे अधिक लक्ष द्यावे त्यांचे अधिकार व प्रतिष्ठेचे रक्षण करावे.

(2) बुद्धीमान लोकांना शासन कार्यामध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

(3) गरीब श्रीमंत यांच्या समन्वय साधण्याचा प्रयत्न करावा

(3) श्रीकशाही :- विभिन्न वर्गात सामंजस्य निर्माण करणे. श्रीमंत लोकांच्या संपत्तीचे संरक्षण करावे लक्ष द्यावे. धनिकशाहीही शासन कार्यात भाग घेऊ द्यावा

(4) समता व न्याय प्रस्थापित करावा.

(5) प्रशासनातील भ्रष्टाचार दूर करावा।

(6) सर्वसामान्यांना प्रशासनामध्ये योग्यतेनुसार संधी द्यावी

(4) मिश्र संविधान :- ॲरिस्टॉटलने क्रांती टाळण्यासाठी प्रत्येक शासन व्यवस्थेमध्ये मिश्र संविधानाचा स्विकार करण्यात यावा. यामध्ये सर्वच हक्कांचा विचार करण्यात यावा। असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

अशाप्रकारे ॲरिस्टॉटलने वरीलप्रमाणे क्रांतीच्या कारणांचा आणि उपायांचा विचार मांडलेला आहे.

ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्यासंबंधीचे विचार

(1) प्रस्तावना —

(2) आदर्श राज्य — प्लेटोप्रमाणेच ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. प्लेटोचे उपआदर्श राज्य म्हणजे ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्य होय. ज्या राज्यपद्धतीमध्ये मध्यमवर्गीय हातामध्ये सत्ता असेल. नागरिकांचा विकास होईल असे ॲरिस्टॉटलचे मत आहे ॲरिस्टॉटलवर मत लोकतंत्र,

Scanned with CamScanner

अलौकिक राज्य असेल असे हे उत्कृष्ट किंवा आदर्श राज्य खालील घटकांवर अवलंबून असेल.

(1) लोकसंख्या :— प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलनेहि राज्याच्या लोकसंख्येबाबत विचार मांडला आहे. परंतु प्लेटोने सांगितले त्या संख्येचे समर्थन ॲरिस्टॉटल करीत नाहि. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याची लोकसंख्या आवश्यकतेपेक्षा जास्त नसावी किंवा फार कमीहि नसावी. लोकसंख्या जास्त असल्यास लोकांना कामधंदा मिळणार नाहि आणि कमी असल्यास राज्याचे अस्तित्व धोक्यात येईल. म्हणून त्यांनी मध्यम लोकसंख्येचे समर्थन केले आहे.

(2) भूप्रदेश :— ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे क्षेत्रफळ फार विशाल किंवा संकुचित नसावे तेहि मध्यम स्वरूपाचे असावे. राज्य हे बाह्य आक्रमणापासून सुरक्षित आणि आर्थिक दृष्टीने संपन्न राहील असा भूभाग असावा. तसेच राज्य हे समुद्रकिनाऱ्यालगत असावे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. परंतु प्लेटोने राज्य हे समुद्रकिनाऱ्यापासून दूर असावे असे मत मांडले होते. तसेच रक्षणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने चारीहि बाजूंनी किल्ले असावेत. भूप्रदेशात हवामान अतिशय उष्णहि नको व अतिशय थंड हि नको तर समशीतोष्ण असावे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(3) ~~वर्ग~~ वर्गव्यवस्था / समाजव्यवस्था :—

ॲरिस्टॉटलच्या मते आदर्श राज्यात 6 वर्ग असावेत. (1) पुजारी व धार्मिक कार्य करणारा वर्ग (2) प्रशासक वर्ग (3) सैनिक वर्ग (4) व्यापारी वर्ग (5) शेतकरी आणि श्रमिक वर्ग (6) शिल्पकारांचा वर्ग

ॲरिस्टॉटलने केलेले सामाजिक वर्गीकरण जातीवर किंवा वंशावर आधारित नसून कार्यावर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीच्या गुणांच्या आधारावर

कार्य कौशल्याच्या आधारावर एक वर्गातून दुसऱ्या वर्गा- जाता येईल. सामुहिक वर्गसंघर्ष होणार नाही. प्रत्येकाबद्दल आदर निर्माण होईल असे ॲरि. मत आहे.

(4) जनतेचे चारित्र्य :- ॲरिस्टॉटलच्या मते आदर्श राज्यामधील नागरिकांचे चारित्र्य उत्तम असले पाहिजे. त्यांच्यामते नैतिकता, बुद्धी, शौर्य, चैतन्य इ. गुण असले पाहिजेत. असे त्यांना वाटते. त्याशिवाय चांगल्या राज्याची निर्मिती होऊ शकत नाही.

(5) शिक्षणव्यवस्था :- आदर्श राज्यातील शिक्षण राज्याच्या नियंत्रणाखाली सक्तीचे असावे. सर्व नागरिकांना समान शिक्षण दिले जावे. चारित्र्यसंपन्न नागरिकांसाठी शिक्षणाची आवश्यकता असते. शिक्षणाबाबत त्यांनी तीन टप्पे सांगितले आहेत (1) ७ वर्षापर्यंतचे शिक्षण (2) ७ ते १४ वर्षापर्यंतचे शिक्षण (3) व १४ ते २१ वर्षापर्यंतचे शिक्षण पहिल्या टप्प्यात नैतिक, शारिरीक, बौद्धीक, दुसऱ्या टप्प्यात नैतिक, शारिरीक, आज्ञापालन शिस्त-वळण तिसऱ्या टप्प्यात बौद्धीक, संगीत, गणित इ. चे शिक्षण देण्यात यावे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(6) संमिश्र संविधान :- ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधानाचे समर्थन केले आहे. त्यामध्ये राजेशाही, महाजनशाही, मर्यादित लोकशाही इ. मधील चांगल्या तत्वाचा स्विकार करुन राज्यघटना तयार करावी. त्यामध्ये धनिकांची हुकूमशाही किंवा जनसमुहांची आराजकता असणार नाही.

(7) सार्वभौम सत्ता :- सार्वभौम ही संकल्पना

Scanned with CamScanner

आधुनिक काळात विकसित झाली आहे. यापैकी काही ॲरिस्टॉटलच्या नसली तरीही अप्रत्यक्षपणे त्याच्या विचारात सार्वभौम सत्तेचा विचार दिसून येतो. सार्वभौम सत्ता निरंकुश नसावी. सत्तेचा उपयोग स्वार्थ साधण्यासाठी करू नये सत्तेमध्ये सर्वांचा समावेश असावा असे त्यांनी विचार मांडलेला आहे.

(8) कायद्याची सर्वश्रेष्ठता :- कायद्याचे श्रेष्ठत्व हे एक आदर्श राज्याचे वैशिष्ट्ये आहे कायदा मानवनिर्मित असला तरी तो पवित्र असतो. कायद्याचे पालन शासक व शासित दोघांनाही आवश्यक असते. व्यक्ती कितीही बुद्धीमान असला तरी त्याला कायद्यापेक्षा श्रेष्ठ स्थान देवू नये. कायद्याच्या मर्यादेमध्ये राहूनच शासकाने कार्य करावे. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

(9) न्यायव्यवस्था :- समाजातील 6 वर्गांनी आपापल्या कर्तव्याचे पालन करणे व आपापले कार्य व जबाबदारी पार पाडणे इतरांच्या कामामध्ये हस्तक्षेप करू नये यामुळे समाजात न्यायाचे वातावरण निर्माण होईल.

(10) संपत्तीसंबंधी विचार :- ॲरिस्टॉटलच्या मते शासनकर्त्यांनी संपत्तीच्या आधारावर शासन कार्य करावे परंतु त्यांनी शासनकर्त्यांनी योग्य प्रकारे संपत्ती मिळवावी अनैतिक मार्गानी मिळवू नये किंवा संपत्तीचा संचय करू नये आवश्यक तेवढीच संपत्ती बाळगावी जास्त बाळगू नये.

Scanned with CamScanner

(1) कुटुंबव्यवस्था :- कुटुंबातील सर्व व्यक्तींनी सन्मान करावे असे अॅरिस्टॉटलचे मत आहे कुटुंबसंस्था स्वाभाविक आहे ते निकोपात्मक संबंधाचे स्वरूप आहे. अॅरिस्टॉटलच्या कुटुंबव्यवस्थेचा विचार प्लेटोच्या कुटुंबसंस्थेच्या विरुद्ध आहे आहे मानवाला मिळून येतो कुटुंबाच्या प्रमुखाचे वर्चस्व कुटुंबातील व्यक्तींवर, संपत्तीवर असावे असे अॅरिस्टॉटलचे मत आहे.

(2) नगर राज्य :- अॅरिस्टॉटलच्या आदर्श राज्या मध्ये वरील घटकांशिवाय नागरी काही घटकांचा उल्लेख करता येईल

(1) बाह्य आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी सैन्यदल, किल्ले व तटबंदीची आवश्यकता असते.

(2) राज्य प्रमुखांनी पाणी, रस्ते याकडे लक्ष द्यावे.

(3) राज्याची रचना एका भागात वस्ती व दुसऱ्या भागात व्यायामशाळा, पुजागृह, बाजार इ. ची व्यवस्था असावी.

(4) शासनकार्य करण्यासाठी तीन शाखा असाव्यात 1) साधारण सभा 2) प्रशासकीय अधिकारी 3) न्यायालय

(5) आदर्श राज्यातील प्रत्येक नागरिकाला शासनाचे कार्य करण्याची संधी मिळेल असे त्यांचे मत आहे.

अशाप्रकारे अॅरिस्टॉटलनी वास्तविक परिस्थितीचा विचार करून आदर्श राज्याचा विचार मांडलेला आहे. त्याच्या या विचारांमध्ये व्यावहारिकता

આમાવ ઉદ્ભવ થતો. આથી આપણને મળતા થોડા.

* આદર્શ રાજ્યની ટીકા –

(1) અપૂર્ણ વિચાર :- એરિસ્ટોટલનો આદર્શ રાજ્યનો વિચાર અપૂર્ણ છે. તેમણે ત્યાંના શિક્ષણનો વિચાર અપૂર્ણ છે તેમજ કાયદાકીય મંડળ, કારોબારી મંડળ, ન્યાયમંડળ વગેરેના રચનાના કાર્યપદ્ધતિ. તેના ઉલ્લેખ કરેલ સ્પષ્ટ નથી.

(2) જૂનાય વિચાર :- એરિસ્ટોટલના આદર્શ રાજ્યના વિચાર જૂના છે. પ્લેટોના ઉપઆદર્શ રાજ્યની પ્રતિરૂપ કહેવાય એરિસ્ટોટલનો આદર્શ રાજ્ય હોય. પ્લેટોના વિચારોમાં તેમણે કાંઈક પરિવર્તન કર્યું છે પરંતુ મૂળ વિચાર પ્લેટોના જ છે.

(3) ~~પ્લેટોના~~ અત્યંત મહાન રાજ્ય :- એરિસ્ટોટલનો આદર્શ રાજ્ય એકદમ મહાન છે. થોડા વ્યક્તિઓ અધિકાર ભોગવે છે. મજૂરો, શિલ્પકાર, શ્રમિક, ગુલામ, સ્ત્રીઓ વગેરે નાગરિકત્વના અધિકારથી દૂર રહેવામાં આવે છે તે સંકુચિત છે.

(4) સામાજિક વ્યવસ્થા અયોગ્ય :- એરિસ્ટોટલને જે સામાજિક વ્યવસ્થાની હિમાયત કરી છે તે વ્યવસ્થા અનુદારવાદી છે કારણ સમાજના અનેક વ્યક્તિઓને નાગરિકત્વથી દૂર રાખવા તે આદર્શ રાજ્યના સિદ્ધાંતની ભૂલ છે.

(5) લોકશાહીમાં નગણ્ય સ્થાન :- એરિસ્ટોટલને લોકશાહી શાસનવ્યવસ્થાનો મહત્વ ઓછું

नाही लोकशाहीला तो झुंडशाही किंवा अशुद्ध मानतो
परंतु आधुनिक युगात लोकशाहीला स्वरूपच मह-
त्त्व प्राप्त झाले आहे. असे विचारवंतांचे मत आहे
(6) गुलामगिरीच्या प्रथेचे समर्थन करणे
आक्षेप :- ॲरिस्टॉटलने गुलामगिरी व्यवस्थे-
चे समर्थन केले आहे. ज्या राज्यामध्ये गु-
लामगिरीची व्यवस्था असते. त्या राज्याला आदर्श
राज्य म्हणता येत नाही
(7) स्त्रियांच्या बाबतीत आक्षेपार्ह विचार :- ॲरि-
स्टॉटलने स्त्रियांना वासना व दुर्बलतेचे
प्रतिक मानले तिचे कार्यक्षेत्र चार भिंतीच्या आत
च आहे ती अपूर्ण पुरुष आहे. तिचे गौण स्थान
असल्याचा विचार मांडला आहे तो आक्षेपार्ह आहे.
यामुळे स्त्री-पुरुषामध्ये विषमता निर्माण होते.
अशाप्रकारे ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्या-
मध्ये वरीलप्रकारचे दोष दिसून येतात. तरी परंतु
ॲरिस्टॉटलच्या या विचारांचे महत्त्व नाकारता ये-
त नाही कारण त्यांनी वास्तविक परिस्थितीचा
विचार करून विचार मांडला आहे

x——x——x——x——x——x

Scanned with CamScanner